NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020
YEAR : 45) 1st April 2020 ( No. of Pages 08 ) ( No : 03

*मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या माहितीसाठी २५ मुद्यांचे एक तपशीलवार टिपण*

# मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी वित्त विभागाच्या सल्ल्याची किंवा मान्यतेची आवश्यकता नाही

## मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे

**प्रा.बी.टी.देशमुख**
*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेमध्ये गुरूवार, दिनांक ५ मार्च २०२० रोजी "राज्यातील प्राध्यापकांनी परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार घातलेल्या कालावधीतील वेतन अदा करणे" या विषयावर लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने तपशीलवार चर्चा झाली. विधानमंडळाचे कामकाज दूरचित्रवाणीवरून प्रसारित होत असल्यामुळे महाराष्ट्रातील आम जनतेने ही सर्व चर्चा स्पष्टपणे ऐकली व पाहिली सुद्धा. मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी त्याच दिवशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाला चर्चेसाठी बोलाविले होते. ती चर्चा आटोपून मी अमरावतीला दुसऱ्या दिवशी सकाळी परत आलो, तर अनेक प्राध्यापक या ध्वनिचित्रफितीच्या प्रति घेऊन माझ्या निवासस्थानी पोहचले होते.

**२.** ही पूर्ण चर्चा ऐकल्यावर व पाहिल्यावर एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात आली ती अशी की, मा.उच्च शिक्षण मंत्र्यांना अधिकाऱ्यांनी अत्यंत चूकीची माहिती पुरविली, इतकेच नव्हे तर घटनात्मक तरतुदींशी विसंगत अशा प्रकारची माहितीसुद्धा पुरविली. या चुकीच्या माहितीच्या आधारावर त्या दिवशीच्या चर्चेमध्ये मा. शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात जे उद्‌गार काढले व जी आश्वासने दिलीत ती अवतरणात शब्दशः पुढीलप्रमाणे:-

(१) "सदरहू विशेष अनुमती याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०२.०३.२०२० रोजी झालेल्या सुनावणीमध्ये फेटाळून लावली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय विचारात घेऊन प्रस्तुत प्रकरणी **वित्त विभाग आणि विधि व न्याय विभागाच्या सल्ल्याने पुढील कार्यवाही करण्यात येईल.**"

(२) "हा निकाल लागला असला तरी यासंदर्भातील **कायदेशीर बाबी विधी व न्याय विभाग आणि वित्त विभागाकडून तपासून घेण्यात येतील.** ज्या पध्दतीने सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला त्याच्या अधीन राहून दोन्ही विभागांकडे विचारविनिमय करुन पुढील निर्णय घेण्यात येईल."

(३) "या निकालाप्रमाणे **दोन्ही विभागांकडे जाऊन** जी कार्यवाही आहे ती केली जाईल."

(४) "सर्वोच्च न्यायालयाचा सन्मान राखून **वित्त विभाग आणि विधी व न्याय विभागाकडे** हे प्रकरण पाठवून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली जाईल, असे मी उत्तर दिलेले आहे."

(५) "मी असे सांगितले की, हे सर्व विषय **विधी व न्याय आणि वित्त विभागाशी निगडित आहेत.** तत्काळ या दोन्ही विभागांसमवेत चर्चा करुन सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिलेला आहे त्याची अंमलबजावणी करण्यात येईल."

(६) "मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शासनावर १९१ कोटी ८१ लाख ९८ हजार ६६९ रुपयांचा वित्तीय भार पडणार आहे. **वित्तीय भार येत असल्यामुळे वित्त विभागाकडे विचारणा करुन** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे निर्णय घेतला जाईल, असे मी चौथ्यांदा सांगत आहे."

(७) "शासन सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा आदर ठेवूनच प्राध्यापकांवर अन्याय होणार नाही याची दक्षता घेईल."

(८) "तसेच कोणत्याही परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी होईल."

(९) "सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे, **त्याची वित्त विभागासमवेत** चर्चा करुन अंमलबजावणी करण्यात येईल."

(१०) "आमच्या विभागाला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करता यावी याकरिता **वित्त विभागाने १९१ कोटी रुपये आमच्या विभागाला द्यावेत अशी त्यांना विनंती केली जाईल.**"

(११) "**परंतु आमच्या खात्याला अशा विषयाकरिता स्वतंत्र बजेट नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सदर पैसे देण्याकरिता वित्त विभागाकडे तत्काळ विनंती केली जाईल.**"

**३.** ही सर्व आश्वासने काळजीपूर्वक वाचली तर असे लक्षात येते की, अधिकाऱ्यांनी घटनात्मक तरतुदीविषयी दिशाभूल करणारी, चुकीची व असत्य माहिती मा.उच्च शिक्षण मंत्र्यांना दिलेली होती. मा. सर्वोच्च न्यायालयाने एकदा निर्णय दिल्यानंतर, तो निर्णय वित्त विभाग, विधी व न्याय विभाग यांच्या कडील लहान मोठ्या 'बाबुं'च्या टेबलावर फिरवून त्यावर त्यांचे शेरे ताशेरे घेऊन मगच त्याबाबत उच्च शिक्षण विभागाला कारवाई करता येते असे म्हणणे योग्य नाही. **"आपल्या खात्याला अशा विषयाकरिता स्वतंत्र बजेट नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सदर पैसे देण्याकरिता वित्त विभागाकडे तात्काळ विनंती केली जाईल"** ही अधिकाऱ्यांनी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना पुरविलेली माहिती संपूर्णपणे या अधिकाऱ्यांच्या भारतीय संविधानातील तरतुदींच्या अज्ञानावर आधारित आहे. **एकदा मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यावर त्यातून उद्‌भवणारा खर्च राज्याच्या संचित निधीवरील भारित खर्च (charged expenditure) असतो. त्यासाठी अमुक एका विभागाला स्वतंत्र बजेट असण्याची गरज नसते.** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी येणारा खर्च राज्याच्या संचित निधीवरील भारित खर्च असतो व हा राज्याच्या अंदाजपत्रकाचा अपरिहार्य भाग असतो. विधानमंडळाला सादर केलेल्या अथवा करावयाच्या

**If the order is not complied with, the Respondents will have to pay the cost of Rs.1,000/- per day for each day's default in making payment from the date on which judgment was delivered by this Court till this date.**

*(See para 2 of the H.C. Judgment dated 9th March 2020 : Page 34 of this Bulletin)*

***मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी येणारा खर्च राज्याच्या संचित निधीवरील भारित खर्च असतो व हा राज्याच्या अंदाजपत्रकाचा अपरिहार्य भाग असतो. विधानमंडळाला सादर केलेल्या अथवा करावयाच्या वित्तीय विवरण पत्रामध्ये तो स्वतंत्रपणे अमतदेय भाग***

***(non-votable part)***

***म्हणून दाखवावा लागतो. त्यावर चर्चा होऊ शकते, पण मतदान होऊ शकत नाही.***

*(पत्राचा परिच्छेद ३ पहा)*

वित्तीय विवरण पत्रामध्ये तो स्वतंत्रपणे अमतदेय भाग (non-votable part) म्हणून दाखवावा लागतो. त्यावर चर्चा होऊ शकते, पण मतदान होऊ शकत नाही.

४. याबाबतच्या घटनात्मक तरतुदी अतिशय स्पष्ट आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे जो काही खर्च येणार असेल तो खर्च हा महाराष्ट्र राज्याच्या संचित निधी वर भारित खर्च (charged expenditure) असतो. निरनिराळ्या प्रकारचे सहा खर्च हे भारतीय संविधानात राज्याच्या संचित निधी वर भारित खर्च म्हणून नमूद केलेले आहेत. त्याचे तपशील भारतीय संविधानाच्या खंड २०२ च्या उपखंड ३ मध्ये नमूद आहेत. तो उपखंड ३ शब्दशः पुढीलप्रमाणेः-

**"(3) The following expenditure shall be expenditure charged on the Consolidated Fund of each State -**

(a) the emoluments and allowances of the Governor and other expenditure relating to his office;

(b) the salaries and allowances of the Speaker and the Deputy Speaker of the Legislative Assembly and, in the case of a State having a Legislative Council, also of the Chairman and the Deputy Chairman of the Legislative Council;

(c) debt charges for which the State is liable including interest, sinking fund charges and redemption charges, and other expenditure relating to the raising of loans and the service and redemption of debt;

(d) expenditure in respect of the salaries and allowances of Judges of any High Court;

**(e) any sums required to satisfy any judgment, decree or award of any court or arbitral tribunal;**

(f) any other expenditure declared by this Constitution, or by the Legislature of the State by law, to be so charged."

५. राज्याचे मा. राज्यपाल (व त्यांच्या कार्यालयावरील खर्च), विधानसभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विधानपरिषदेचे सभापती, उपसभापती, मा.उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांच्या एखाद्या निर्णयाने वित्त मंत्रालयातील एखादा बाबू कोपभवनात जाऊन बसला व त्याने निर्णयदात्याचे वेतन व भत्ते रोखून ठेवले असा प्रकार घडू नये म्हणून या महनीय व्यक्तींचे वेतन व भत्ते भारतीय संविधानातील तरतुदीनुसार राज्याच्या संचित निधीवर भारित खर्च म्हणून आकारण्यात आलेले आहेत. तीच स्थिती सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून उद्भवणाऱ्या खर्चाला लागू आहे. **वित्त मंत्रालयातील बाबूंच्या कृपेवर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी घटनाकारांनी सोडलेली नाही, यापेक्षा विपरित मांडणी घटनेच्या घोर अज्ञानाची अघोरी मांडणी आहे.** मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून उद्भवणारा खर्च हा घटनाकारांनी राज्याच्या संचित निधीवरील भारित खर्च म्हणूनच विहित केलेला आहे.

६. राज्याकडे सर्व मार्गांनी येणारे उत्पन्न राज्याच्या संचित निधीमध्येच जमा करावे लागेल अशी तरतूद घटनेच्या खंड २६६ मध्ये आहे. विधानमंडळाने कायदा करून मान्यता दिल्यावरच व दिल्या प्रमाणे शासनाला संचित निधीतून खर्च करता येईल. (खंड २६६ (३)) असा कायदा करण्याच्या प्रयोजनार्थ

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

CIVIL APPELLATE JURISDICTION

## CONTEMPT PETITION NO. 535 OF 2019

**Ranpise Vijaykumar Baburao...Petitioner.**

***VERSUS***

**Dr. Saurabh Vijay, The Principal Secretary State of Maharashtra & Others ...Respondents.**

Mr. Devyani Kulkarni for the Petitioner. Mr. Rajendra Anbhule for Respondent No. 5.
Mr. V. M. Mali, AGP for the Respondent-State.

**Coram : R.K.DESHPANDE, & PRITHVIRAJ K.CHAVAN, JJ.**

**Date : March 9, 2020.**

P.C. :

**1.** The complaint in this petition is regarding non compliance or disobedience of the order dated 9th April 2019 passed by this Court in Writ Petition No.755 of 2019. The said decision was challenged before the Apex Court by filing SLP (Civil) No. 1076 of 2020 and it has been dismissed on 7th February 2020. The decision delivered by this Court has attained finality. However, till this date, the order has not been complied with and the Petitioner is not paid with the arrears of pension.

**2.** Issue notice before admission to the Respondents, returnable on 4 th May 2020. In the meantime, we provide an opportunity to the Respondents to purge the contempt. **If the order is not complied with, the Respondents will have to pay the cost of Rs.1,000/- per day for each day's default in making payment from the date on which judgment was delivered by this Court till this date.**

[PRITHVIRAJ K.CHAVAN, J.] [R.K.DESHPANDE, J.]

***त्यात त्यांनी कुठेही यांचा सल्ला घ्या किंवा त्यांचा सल्ला घ्या, यांच्या मान्यतेसाठी पाठवा किंवा त्यांच्या मान्यतेसाठी पाठवा अशी भाषा या परिपत्रकात वापरलेली नाही, तर थेट कक्ष अधिकाऱ्यांच्या स्तरावरील किंवा इकडे उच्च शिक्षण विभागात सहसंचालकांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांना परस्पर थेट न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार देऊन ठेवलेला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे घटनेतील तरतुदीच होय.***

*(पत्राचा परिच्छेद १२ पहा)*

"वार्षिक वित्तीय विवरणपत्र" सभागृहाला सादर करावे लागेल. (खंड २०२) या विवरणपत्रामध्ये भारित खर्च (charged expenditure) अमतदेय भाग म्हणून वेगळा दाखवावा लागेल. इतर खर्च (other expenditure) हा वेगळा मतदेय भाग (votable part) म्हणून दाखवावा लागेल. (खंड २०२ (२)) अमतदेय भागात समाविष्ट असलेल्या खर्चावर चर्चा होऊ शकेल, मतदान करता येणार नाही. (खंड २०३ (१)) हा भाग मतदानाशिवाय मंजूर करावयाचा भाग असेल. इतक्या स्पष्ट तरतुदी भारतीय संविधानात समाविष्ट आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे काही खर्च करावा लागला तर तो संचित निधीवरील भारित खर्च म्हणूनच करावा लागतो.

**७.** विधी व न्याय विभाग, वित्त विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग या सर्व विभागांचे सचिव हे उच्च विद्याविभूषित असे भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकारी आहेत. या साऱ्या अधिकाऱ्यांना घटनेतील या सर्व तरतुदी ठाऊक असतांना मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या खुद्द लेखी निवेदनामध्ये "**वित्त विभाग आणि विधी व न्याय विभाग यांच्या सल्ल्याने पुढील कारवाई केली जाईल**" अशी 'आरती' घुसडण्यात आली, ही केवळ आश्चर्यजनक नव्हे तर खेदजनक बाब आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर व निर्णयानंतर असा सल्ला घेण्याची विधाने सभागृहात करणे हे घटनाबाह्य आहे.

### *विधी व न्याय विभागाचे आदेश*

**८.** उपरोक्त सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनेतील या सर्व तरतुदी ठाऊक होत्या व आहेत, हे नमूद करणारे पुरावे आता मी सादर करू इच्छितो. मा. सर्वोच्च न्यायालय तर सोडाच पण मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केल्यानंतर त्यासाठी कोणताही वेगळा शासननिर्णय वगैरे निघण्याची वाट न पाहता किंवा कोणाचाही सल्ला वगैरे न घेता त्याची अंमलबजावणी ताबडतोबीने करावी असे आदेश वारंवार शासनातर्फे देण्यात आलेले आहेत. दिनांक २ एप्रिल २०१४ रोजी विधी व न्याय विभागाने "Action to be taken when the decision of High Court is adverse to the State and is not stayed by Hon'ble the Supreme Court of India" या विषयावर काढलेल्या परिपत्रकामध्ये (No.: 820-2014/Misc./E Branch) असे नमूद केले आहे की, :-

"2. If the appeal/SLP is filed by the State against the order of the Hon'ble the High Court, but no stay is granted to the implementation and enforcement of the order of the Hon'ble the High Court, **such orders would have to be implemented failing which the concerned officer/department may face the action for contempt of Court.** The order against which no stay has been granted will have to be complied with/implemented subject to the final decision of the Hon'ble the Supreme Court." *(P101NB2014)*

### *वित्त विभागाचे आदेश*

**९.** विधी व न्याय विभागाच्या परिपत्रकानंतर २० ऑक्टोबर २०१४ रोजी वित्त विभागाने "**न्यायालयीन प्रकरणे त्वरित निकाली काढणे व अवमान याचिकेसंदर्भात**" या मथळ्याचे एक परिपत्रक (क्रमांक न्यायप्र २०१४/प्र.क्र. ८९६/प्रशा १) निर्गमित केले असून त्या परिपत्रकामध्ये स्पष्टपणे असे नमूद केले आहे की, :-

"या संदर्भात सर्व विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, अशा न्यायालयीन प्रकरणात वित्त विभागाने मांडलेली भूमिका / निर्णय संबधित विभागाने तातडीने याचिकाकर्त्यांना न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेत कळवावा. **तसेच न्यायालयाने विशिष्ट मुदत घालून दिलेल्या प्रकरणांमध्ये मुदतीपूर्वीच यथोचित कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरून अकारण अवमान याचिका दाखल होणार नाहीत.**" *(P12NB2015)*

### *मा. मुख्य सचिवांचे आदेश*

**१०.** "**न्यायालयीन प्रकरणे त्वरित निकाली काढण्याबाबत**" या विषयावर राज्याच्या मुख्य सचिवांच्या स्वाक्षरीने पुन्हा २८ ऑक्टोबर २०१४ रोजी वित्त विभागाने आणखी एक परिपत्रक काढले असून त्या परिपत्रकात पुढीलप्रमाणे

***प्रा.बी.टी.देशमुख,***

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**३, सुबोध कॉलनी, विदर्भ महाविद्यालय रोड, अमरावती - ४४४ ६०४**

फो. नं. ०७२१-२५३००८० मो.नं. ९८९०९०९७०१

***दिनांक :- ०९ मार्च २०२०***

**प्रति,**

मा. उच्च शिक्षणमंत्री,

महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

**मार्फत :** सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती

**विषय :** "मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी वित्त विभागाच्या सल्ल्याची किंवा मान्यतेची आवश्यकता नाही" हे स्पष्ट करणारे तपशीलवार टिपण.

मा. महोदय,

विषयोक्त बाबीवर तपशीलवार माहिती देणारे २५ परिच्छेदाचे एक टिपण मी आपणास सादर करीत आहे. त्यावर यथोचित विचार होऊन योग्य ती कारवाई व्हावी, अशी विनंती आहे.

आपला विनित,

प्रा.बी.टी.देशमुख,

माजी विधानपरिषद सदस्य

**सहपत्र :** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी वित्त विभागाच्या सल्ल्याची किंवा मान्यतेची आवश्यकता नाही हे स्पष्ट करणारे २५ परिच्छेदांचे तपशीलवार टिपण.

***''परंतु आमच्या खात्याला अशा विषयाकरिता स्वतंत्र बजेट नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सदर पैसे देण्याकरिता वित्त विभागाकडे तत्काळ विनंती केली जाईल.''*** *(पत्राचा परिच्छेद २. (११) पहा)*

नमूद करण्यात आलेले आहे. :-

"**परिपत्रक :** उपरोक्त दिनांक २० ऑक्टोंबर,२०१४ च्या परिपत्रकान्वये न्यायालयीन प्रकरणात वित्त विभागाने मांडलेली भूमिका/निर्णय संबधित विभागाने तातडीने याचिकाकर्त्यांना न्यायालयाने ठरवून दिलेल्या वेळेत कळविण्याबाबत तसेच अवमान याचिकेसंदर्भात न्यायालयाने विशिष्ट मुदत घालून दिलेल्या प्रकरणांमध्ये मुदतीपूर्वीच यथोचित कार्यवाही करण्याची दक्षता घेण्याबाबतच्या सूचना सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन सर्व प्रशासकीय विभागांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, विभागांनी आपल्या अधिनस्त सर्व न्यायालयीन प्रकरणांचा वेळोवेळी आढावा घेऊन **न्यायालयीन प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. एखादे न्यायालयीन प्रकरण कार्यवाहीविना प्रलंबित राहिल्यास संबंधित कार्यासनाच्या कक्ष अधिकारी यांना त्याबाबत व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.**" *(P13NB2015)*

*उच्च शिक्षण विभागाचे आदेश*

**११.** विधी व न्याय विभागाने २ एप्रिल २०१४ रोजी परिपत्रक काढले, वित्त विभागाने याबाबतीत प्रथम २० ऑक्टोबर २०१४ रोजी परिपत्रक काढले. त्यानंतर वित्त विभागाने दिनांक २८ ऑक्टोबर २०१४ रोजी मुख्य सचिवांच्या सहीने आणखी पुन्हा एक परिपत्रक काढले. त्यानंतर ११ नोव्हेंबर २०१४ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सुद्धा याबाबतीत एक परिपत्रक (क्र.न्यायप्र २०१४/प्र.क्र.४७४/१४/वि.शि.-१) काढले. त्या परिपत्रकाच्या परिच्छेद 1 (vi) मध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, :-

"(vi) मा. उच्च न्यायालयाच्या अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास **स्थगिती देण्यात आलेली नसेल तर त्यांची विहीत मुदतीत अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.**" *(P2NB2015)* **याच परिपत्रकामध्ये न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पूर्णपणे सहसंचालकांवर टाकण्यात आलेली असून त्यांनी उगाच संचालकांकडे मार्गदर्शन मागू नये कारण संचालकांकडे तुम्ही मार्गदर्शन मागितले की, संचालक सुद्धा त्यावर योग्य निर्णय न घेता प्रकरण शासनाकडे पाठवितात. तेव्हा याबाबतची कार्यवाही ही सहसंचालकांनी करावी व याबाबतची माहिती शासनाकडे दाखल करण्यात यावी असेही या आदेशात नमूद आहे. ते पुढील शब्दात :-**

"**४. प्रस्तुत प्रकरणांमधील मा. उच्च न्यायालयाचे आदेश स्वयंस्पष्ट आहेत.** त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून **वरील आदेशाची अंमलबजावणी संबंधित विभागीय सहसंचालक यांच्या स्तरावरुन करणे आवश्यक होते.** तथापि, विभागीय सहसंचालक, उ.शि. औरंगाबाद यांनी तशी कार्यवाही न करता संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडे मार्गदर्शन मागितल्याचे दिसते. तसेच संचालकांनी सुद्धा त्यावर योग्य निर्णय न घेता प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. त्यामुळे **विभागीय सहसंचालक, उ.शि., औरंगाबाद विभाग, औरंगाबाद व संचालक, उच्च शिक्षण यांनी खुलासा शासनास सादर करावा.**" *(P2NB2015)*

**१२.** मुख्य सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव, वित्त विभागाचे सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव यांनी निर्गमित केलेले उपरोक्त आदेश काळजीपूर्वक पाहिले तर असे दिसून येते की, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय तर दूरच राहिला पण उच्च न्यायालयाच्या निर्णयावरसुद्धा स्थगनादेश मिळाला नसेल तर त्याची अंमलबजावणी करणे हे बंधनकारक आहे व ते घटनात्मक बंधन आहे. याची या ज्येष्ठ अधिकाऱ्यांना पूर्ण कल्पना आहे, हे स्पष्ट दिसून येते. **त्यात त्यांनी कुठेही यांचा सल्ला घ्या किंवा त्यांचा सल्ला घ्या, यांच्या मान्यतेसाठी पाठवा किंवा त्यांच्या मान्यतेसाठी पाठवा अशी भाषा या परिपत्रकात वापरलेली नाही, तर थेट कक्ष अधिकाऱ्यांच्या स्तरावरील किंवा इकडे उच्च शिक्षण विभागात सहसंचालकांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांना परस्पर थेट न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार देऊन ठेवलेला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे घटनेतील तरतुदीच होय.**

**१३.** अनेक नेट-सेट मुक्त शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्याच्या बाजूने मा. उच्च न्यायालयाचे अनेक निर्णय झालेत, त्यावेळेला संघटनेच्या वतीने वर नमूद केलेली परिपत्रके जेव्हा निरनिराळ्या विभागांच्या सहसंचालकांच्या लक्षात आणून देण्यात आली, त्यावेळेला उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे शेकडो शिक्षकांना करिअर ॲडव्हान्समेंटचे लाभ लागू करणारे आदेश त्या त्या ठिकाणी सहसंचालकांनी काढले व त्याप्रमाणे या शिक्षकांना तसे लाभ प्राप्त झाले. या सर्व सहसंचालकांनी संचालकांचा सल्ला घेतला नाही, वित्त विभागाचा सल्ला घेतला नाही, विधी व न्याय विभागाचा सल्ला घेतला नाही. जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली असल्यामुळे अवमान याचिका दाखल होऊ नये म्हणून शेकडो शिक्षकांना लाभ देणारे निर्णय प्रत्यक्षात त्यांच्या स्तरावर प्रसृत केले. या वेगवेगळ्या विभागीय सहसंचालकांनी आश्वासित प्रगती योजनेचे लाभ न्यायालयीन निर्णयामुळे काही शिक्षकांना देण्यामुळे येणारा खर्च हा दरवर्षी निदान २०० कोटी रूपयेच्या वर असून तो आवर्ती स्वरूपाचा खर्च आहे.

**१४.** निरनिराळ्या सहसंचालकांनी त्या वेळेला जी कारवाई केली ती सर्व उदाहरणे याठिकाणी नमूद करणे शक्य नाही. नमूना म्हणून एखादे उदाहरण सादर करता येईल.

संघटनेच्या वतीने ज्यावेळेला ही वर नमूद केलेली सर्व परिपत्रके सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांच्या लक्षात आणून दिली त्यावेळेला त्यांनी सन २०१३ च्या याचिका क्रमांक ५०७३ मध्ये ज्या १९ नेट-सेट मुक्त शिक्षकांच्या बाजूने मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिला होता, **त्या सर्वांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमचे सर्व लाभ अदा करण्याची कारवाई पूर्ण केली.** दिनांक १५ जानेवारी २०१५ रोजीच्या आदेशामध्ये त्यांनी स्पष्टपणे असे नमूद केले आहे की, :-

"उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाने दिनांक २३.०१.२०१४ च्या आदेशामध्ये मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचे आदेश दिनांक १८.११.२०१३ च्या अनुषंगाने इंटेरिम आदेश दिलेले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. १८.११.२०१३ व दि. २७.११.२०१३ च्या निर्णयाच्या अधिन राहुन **वेतननिश्चिती करण्यात आली आहे.**" *(P28NB2015)*

**१५.** अमरावती विभागाच्या सहसंचालकांच्या या १५ जानेवारी २०१५ रोजीच्या आदेशान्वये करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमचे सर्व लाभ देऊन या १९ नेट-सेट मुक्त शिक्षकांची वेतननिश्चिती करण्यात आली. इतरही विभागाच्या सहसंचालकांनी शेकडो शिक्षकांची वेतनश्रेणी सुधारित करून दिली व त्याप्रमाणे त्यांना आजही वेतन मिळत आहेत. **त्यापैकी जे लोक निवृत्त झालेत त्यांना करिअर ॲडव्हान्समेंट योजनेच्या लाभासह उच्च वेतनावर आधारित जुन्या सेवानिवृत्तीच्या वेतन लाभाचे निर्धारण करण्यात आले व त्याप्रमाणे त्यांना सेवानिवृत्ती किंवा कुटूंबनिवृत्ती वेतन आजही मिळत आहे.**

**१६.** उपलब्ध माहितीवरून असे दिसून येते की, गुरूवार, दिनांक ५ मार्च २०२० रोजी विधानपरिषदेत ही चर्चा सकाळी ११.४० वाजता सुरू झाली व ती १२.१० वाजता संपली. जवळ जवळ ३० मिनिटे ही चर्चा सभागृहामध्ये चालू होती. या चर्चेमध्ये मा.उच्च शिक्षण मंत्र्यांनी जे उद्गार काढले व जी आश्वासने दिलीत ती वर नमूद केलेली आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर आधारित ही चर्चा असल्यामुळे सर्व जबाबदार अधिकारी दिर्घेमध्ये (Officer's Gallary) उपस्थित होते. त्यातील एकाही अधिकाऱ्याने मा.मंत्रिमहोदयांना चिठ्ठी पाठवून "सर्वोच्च न्यायालयात एकदा निर्णय झाला म्हणजे त्यातून उद्भवणारा खर्च भारतीय संविधानातील तरतुदीप्रमाणे राज्याच्या संचित निधीवरील भारित खर्च असतो, त्यासाठी कोणाचाही सल्ला किंवा मान्यता घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही, मुख्य सचिवांनी, वित्त सचिवांनी, विधी सचिवांनी,

***एकदा मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यावर त्यातून उद्भवणारा खर्च राज्याच्या संचित निधीवरील भारित खर्च (charged expenditure) असतो. त्यासाठी अमुक एका विभागाला स्वतंत्र बजेट असण्याची गरज नसते.***

*(पत्राचा परिच्छेद ३ पहा)*

***न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पूर्णपणे सहसंचालकांवर टाकण्यात आलेली असून त्यांनी उगाच संचालकांकडे मार्गदर्शन मागू नये कारण संचालकांकडे तुम्ही मार्गदर्शन मागितले की, संचालक सुद्धा त्यावर योग्य निर्णय न घेता प्रकरण शासनाकडे पाठवितात. तेव्हा याबाबतची कार्यवाही ही सहसंचालकांनी करावी व याबाबतची माहिती शासनाकडे दाखल करण्यात यावी.***

*(पत्राचा परिच्छेद ११ पहा)*

उच्च शिक्षण सचिवांनी यापूर्वी तशा प्रकारचे आदेश पारित केलेले आहेत. आपण त्याची थेट अंमलबजावणी करू शकतो" असे कळविले नाही, हे महाराष्ट्राचे मोठे दुर्दैवच होय. शेवटपर्यंत मा.मंत्रिमहोदय त्यांच्या पातळीवर वित्त विभागाचा व विधी विभागाचा सल्ला घेण्याचा किल्ला लढवित राहिले.

**१७.** त्याच दिवशी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाला त्यांच्या निवासस्थानी चर्चेसाठी दुपारी १ वाजता बोलाविले होते. मी या प्रतिनिधी मंडळातील एक सदस्य होतो. मा.उच्च शिक्षण मंत्र्यांचे बी २ हे निवासस्थान विधानमंडळ सभागृहापासून ५ मिनिटे पायी चालत जाण्याच्या अंतरावर आहे. सभागृहातील उपरोक्त चर्चा आटोपून ठरलेल्या वेळी बरोबर १.०० वाजता मा.उच्च शिक्षण मंत्र्यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी चर्चेला सुरूवात केली. निरनिराळे १२ विषय महासंघाने मा. मंत्रिमहोदयांकडे दिलेले होते. त्यातील **चौथ्या क्रमांकावर "मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ७१ दिवसांचे वेतन अदा करणे" हा विषय होता.** या विषयावर अगदी सुरूवातीलाच "आम्ही या ७१ दिवसांचा पगार निश्चितपणे देणार आहोत," कोणत्या तारखेच्या आत तो देण्यात येईल याबाबतची तारीखसुद्धा अधिकाऱ्यांशी बोलून मा. मंत्रिमहोदयांनी सांगितली. "पाहिजे तर १० दिवस आणखी वाढवून घ्या पण त्या तारखेच्या आत करा" असे त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले व १० दिवसा नंतरची दुसरी तारीख सांगितली. मी येथे या तारखा नमूद करीत नाही, याचे कारण बैठकीच्या कार्यवृत्तामध्ये ज्या तारखा येतील त्याच खऱ्या मानाव्या लागतात असा माझा अनुभव आहे. सारांश काय तर आम्ही ७१ दिवसांचे वेतन देणार आहोत व ते अमुक एका तारखेच्या आत देणार आहोत असे मा.मंत्रिमहोदयांनी सुरूवातीलाच सांगितले. त्यामुळे त्या विषयावर फारशी चर्चा झाली नाही. तसेही मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झालेला असल्यामुळे त्याबाबत आता बोलण्यासारखे आमच्या जवळसुद्धा वेगळे काही नव्हते.

**१८.** मा. मंत्रिमहोदयांशी चर्चेला सुरूवात करतांना व मध्ये आणखी एकदा मी असे म्हणणे मांडले की, "प्रत्येक विषयाच्या बाबतीत आम्ही तपशीलवार व पुराव्यासह मांडणी करणारे निवेदन संघटनेच्या वतीने मा.मंत्रिमहोदयांना दिलेले आहे. त्या प्रत्येक मागणीच्या बाबतीत विभागाचे काय म्हणणे आहे? याबाबतचे तपशील नमूद असलेली टिपणी आम्हाला उपलब्ध झाल्यास त्यावर चर्चा करणे उपयुक्त होईल." दोनही वेळेला मा. मंत्रिमहोदयांनी माझ्या या म्हणण्याला सकारात्मक प्रतिसाद दिला. तशी टिपणी विभागातर्फे तयार करण्यात आलेली होती, ती मा. मंत्रिमहोदयांच्या हाती होती. सचिवांच्या हाती होती, इतर अधिकाऱ्यांच्या हाती सुद्धा होती. मात्र ती टिपणी आम्हाला देण्यात आलेली नव्हती. अजूनही दिल्या गेली नव्हती. सर्व विषयावरील चर्चा आटोपली व बैठक संपण्याची वेळ आली. आम्ही उठून उभे राहिलो. तेव्हा मी पुन्हा एकदा म्हणालो, "मंत्रिमहोदय विभागाचे या प्रत्येक विषयाबाबत काय म्हणणे आहे? हे नमूद असलेली टिपणी त्यांनी द्यायला पाहिजे असे आपण दोन वेळा म्हणालात पण कोणत्याही अधिकाऱ्याने त्यावर काहीही कृती केली नाही. ही गोष्ट मी आपल्या लक्षात आणून देतो." असे म्हटल्यावर मंत्रिमहोदयांनी त्यांच्या हातात असलेली टिपणी सर्वांसमक्ष माझ्या सुपूर्द केली व त्यानंतर क्षणार्धात ते असे म्हणाले की, "त्याच्यावर प्रत्येक मुद्याच्या पुढे मी काही लिहिलेले आहे, तेव्हा ती प्रत माझ्याकडे परत द्या." व बाजूच्या अधिकाऱ्याला टिपणीची प्रत त्यांनी मला द्यायला सांगितली. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी मंडळ व स्वतः मंत्रिमहोदय तसेच सारे अधिकारी ही गोष्ट पहात होते. **बैठक संपल्यानंतर बाहेर जाण्यासाठी आम्ही उभे असतांना मंत्रिमहोदयांच्या आदेशावरून ती टिपणी अधिकाऱ्याने माझ्या सुपूर्द केली. बैठकीच्या दालनातून आम्ही बाहेर पडलो.**

**१९.** त्याच दिवशी काही क्षणापूर्वी विधानपरिषदेत काय चर्चा झाली? हे आम्हाला ठाऊक नव्हते. चर्चा झाली किंवा नाही? हेही आम्हा प्रतिनिधी मंडळातील कोणालाही ठाऊक नव्हते. मंत्रिमहोदयांच्या निवासस्थानाच्या पोर्चमध्ये टॅक्सीची वाट पहात असतांना "**मा. मंत्री महोदय उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०५ मार्च २०२० रोजी आयोजित महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या विविध मागण्यासंदर्भातील बैठकीची टिपणी.**" या मथळ्याची उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तयार केलेली ती टिपणी मी चाळत होतो. "७१ दिवसांचे थकित वेतन अदा करण्याबाबत" या चौथ्या विषयापुढे इतर तपशीलवार माहिती दिल्यावर त्या मजकूराच्या शेवटी पुढील वाक्य होते :-

**"या विशेष अनुमती याचिकेमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०२.०३.२०२० रोजीच्या सुनावणीमध्ये फेटाळली आहे. याबाबत वित्त विभाग आणि विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल."**

ही टिपणी बैठकीच्या सुरुवातीला न मिळाल्यामुळे घटनात्मक तरतुदी आणि राज्यशासनाच्या विविध विभागांनी काढलेली परिपत्रके मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देता आली नाहीत याचे मला मनापासून वाईट वाटले. "**मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करतांना उच्च शिक्षण विभागातील विभागीय सहसंचालकांना जेवढे अधिकार आहेत, तेवढेही अधिकार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबतीत उच्च शिक्षण विभागाच्या मा. मंत्रिमहोदयांना नाहीत" असे अधिकाऱ्यांनी प्रतिपादन करणे हे घटनाबाह्य आहे,** हे मा.मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे, असे मला तीव्रतेने वाटले. उपरोक्त तरतुदी लक्षात आणून द्याव्या म्हणून मा.मंत्रिमहोदयांच्या निवासस्थानाच्या पोर्चमधून मी बैठकीच्या दालनापर्यंत परत गेलो. पण तेथे पुढची बैठक सुरू झाल्याचे कळल्यामुळे परत फिरलो. बैठक संपवून चर्च गेटवरील संघटनेच्या कार्यालयामध्ये आम्ही परत आलो व तेथे प्रतिनिधी मंडळाची बैठक सुरू झाली, त्यावेळेला मंत्रिमहोदयांशी आमची बैठक सुरू होण्याच्या पूर्वी विधानपरिषदेत झालेल्या चर्चेच्या ध्वनिचित्रफीतीच्या वेगवेगळ्या क्लिप्स वेगवेगळ्या माध्यमातून प्रतिनिधीमंडळावर येवून आदळत होत्या.

**२०.** विधानपरिषदेमधील चर्चेमध्ये भाग घेत असतांना त्या सभागृहातील एक ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरराव रावते यांनी काही मुद्दे मांडले. त्यांची सर्वांनी अग्रक्रमाने नोंद घ्यावी असे ते महत्त्वाचे मुद्दे आहेत. त्यांनी मांडलेले विचार पुढीलप्रमाणे आहेत :-

"**श्री.दिवाकर रावते :** सभापती महोदय, प्रत्येक शिक्षक मतदारसंघातील सन्माननीय सदस्यांनी या सदनात मीच यासंबंधी काम करीत आहे असे

***"मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करतांना उच्च शिक्षण विभागातील विभागीय सहसंचालकांना जेवढे अधिकार आहेत, तेवढेही अधिकार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबतीत उच्च शिक्षण विभागाच्या मा. मंत्रिमहोदयांना नाहीत" असे अधिकाऱ्यांनी प्रतिपादन करणे हे घटनाबाह्य आहे.***

*(पत्राचा परिच्छेद १९ पहा)*

***सेवानिवृत्त प्राध्यापकांना थकबाकी मिळते, परंतु कार्यरत असलेल्या प्राध्यापकांची थकबाकी कधी मिळेल? कशी मिळेल? याबाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेऊनसुद्धा तेवढा भाग शासननिर्णयातून वगळण्याचे शौर्य ज्या अधिकाऱ्याने दाखविले त्याचे हे कृत्य अशोभनीय होय !***

*(पत्राचा परिच्छेद २४ (ब) (२) पहा)*

दाखविण्याकरिता प्रश्न विचारले. माझे त्याबद्दल काही म्हणणे नाही. प्रत्येक सन्माननीय सदस्य आपापल्या मतदारसंघातील लोकांकरिता काम करीत असतात. या संदर्भात प्रा.जोगेंद्र कवाडे यांचा काही प्रश्न नाही. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला असल्यामुळे आपल्याला त्याची अंमलबजावणी करावी लागणार आहे. परंतु मला समजत नाही की, या संदर्भात आपण कार्यवाही केली नाही तर, **उच्च न्यायालयामध्ये अवमान याचिका दाखल करता येत असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात काळजी करण्याची गरज नाही.** परंतु मीच केले, मीच केले असे या ठिकाणी दाखविण्याचा प्रयत्न केला जात आहे. आता मी विचारलेल्या प्रश्नाचे शिक्षक मतदार संघातील सन्माननीय सदस्यांनी उत्तर द्यावे. त्या काळात सामान्य नागरिक या नात्याने माझी मुले कॉलेजमध्ये शिक्षण घेत होती. त्या काळात प्राध्यापकांनी संप केला होता. तो सोसण्याची किंवा त्याकरिता त्याग करण्याची त्यांच्यामध्ये हिंमत पाहिजे. **परंतु तसे काही घडले नाही. आम्ही काम केले, काम केले असे तुम्ही सांगत आहात.** आम्ही आतापर्यंत आपले सर्व म्हणणे ऐकून घेतले. प्राध्यापक, शिक्षक आपण सर्व शिकलेले आहोत, आपल्याला सुद्धा आदर असतो. परंतु आता तुम्ही निर्वाणीने सांगत असल्यामुळे मी देखील आता निर्वाणीने सांगत आहे. त्या काळात परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या, परिणामी विद्यार्थ्यांना उशीरा परीक्षा द्याव्या लागल्या. त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागला. याची जबाबदारी कोण घेणार आहे, असे मी प्रत्येक शिक्षक मतदार संघातील सन्माननीय सदस्यांना विचारत आहे. फक्त परीक्षा पुढे ढकलल्या असे नव्हे तर परीक्षांचे निकाल सुध्दा उशीराने लागले. हे सत्य आहे. न्यायालयात जिंकून ७१ दिवस त्यांनी संप केला म्हणून छाती काढून फिरणाऱ्या प्राध्यापकांना ७१ दिवसांचा पगार मिळणार आहे, त्याबद्दल काही हरकत नाही. त्यांनी संप केल्यामुळे त्यासंबंधीचा त्रास त्यांनी हिंमतीने सोसला पाहिजे. मंत्री महोदयांनी त्यांना ७१ दिवसांचा पगार द्या. **परंतु त्या काळात महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना मानसिक यातना दिल्याबद्दल सर्व प्राध्यापकांची एक वर्षाची पगारवाढ रोखणार आहात का?"**

**२१. या प्रकरणी "उच्च न्यायालयामध्ये अवमान याचिका दाखल करता येत असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात काळजी करण्याची गरज नाही,"** असे जे विचार श्री.दिवाकरराव रावते यांनी मांडले त्या संदर्भामध्ये असे नमूद करता येईल की, शासनाच्या पातळीवर चर्चा करून प्रश्न सुटत नसल्यामुळे ६ ते १० हजार शिक्षकांना निरनिराळ्या न्यायालयांमध्ये निरनिराळ्या विषयांवर निरनिराळ्या याचिका दाखल कराव्या लागल्या आहेत. विषयोक्त बाबतीत सुद्धा सन २०१३ पासून याचिका (क्रमांक १९१३) न्यायालयात पडून होती. दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी मा.उच्च न्यायालयाने याबाबतीत निर्णय दिला व **"तीन महिन्यात राज्यशासनाने या ७१ दिवसांचे वेतन अदा करावे"** असे आदेश दिलेत. त्या आदेशाचे पालन झाले नाही, उलट मुदत निघून गेल्यावर उच्च न्यायालयातच पूर्नविलोकन याचिका दाखल करण्यात आली. मा.उच्च न्यायालयाने दिनांक १ नोव्हेंबर २०१९ रोजी ती याचिका फेटाळून लावली. तरीही उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली नाही. मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली. आता ती विशेष अनुमती याचिका २ मार्च २०२० रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सुटत नसेल तर "अवमान याचिका दाखल करता येते" हा जो सल्ला श्री.दिवाकरराव रावते यांनी दिलेला आहे त्याबाबतीत असे नमूद करावेसे वाटते की, चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सुटत नाही हे ठाऊक असल्यामुळेच या शिक्षकांच्या संघटनांनी अवमान याचिका केव्हाच दाखल केलेल्या आहेत. त्याबाबतचा कामापुरता तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

**HIGH COURT OF BOMBAY :** Case Details :

(1) Bench:- Bombay

(2) Presentation Date:-18/10/2019

(3) Lodging No.:-CONPWL/105/2019

(4) Filing Date:-18/10/2019

**Main Matter**

(5) Lodging No.:-WPL/1760/2013

(6) Reg No.:-WP/1913/2013

(7) Petitioner:- Maharashtra Federation of University and College Teachers Organization

(8) Respondent:- Saurabh Vijay and 2 Ors. Dhanraj Mane, Rohidas Kale

(9) Petn.Adv.:- Ankit Kulkarni and Bhavan Mhatre

(10) District:- MUMBAI

(11) Bench:- DIVISION

(12) Status:- Pre-Admission

**(13) Category:- CONTEMPT MATTERS WRIT**

(14) Act :- Mah. Universities Act, 1994

**२२.** हजारो शिक्षकांना सर्वोच्च न्यायालयात न्याय मिळालेला असतांना त्यांच्यावर पुन्हा न्यायालयामध्ये अवमान याचिका दाखल करण्याची वेळ येऊ नये म्हणून काही सदस्यांनी हा प्रश्न सभागृहामार्फत सोडविण्याचा प्रयत्न केला तर त्याबद्दल श्री.दिवाकरराव रावते यांना वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही. खरे म्हणजे सदस्यांच्या कामाचा तो एक महत्त्वाचा भाग असतो व त्यांना तसा अधिकार नियम व कायद्यांनीच दिलेला असतो. या चर्चेमध्ये भाग घेणाऱ्या अनेक प्रतिनिधींनी यापूर्वी सुद्धा सभागृहामध्ये हा प्रश्न निरनिराळ्या माध्यमातून मांडला होता, हे सुद्धा श्री.दिवाकरराव रावते यांनी लक्षात घेतले पाहिजे. तीन महिन्यात कापलेली रक्कम परत करा असा मा.उच्च न्यायालयाने निर्णय देऊन

***या शिक्षकांची थकबाकी अदा करण्यासाठी जवळ जवळ १३०० कोटी रुपयाचे अनुदान केंद्र शासनाकडून उच्च शिक्षण विभागाला प्राप्त झालेले आहे, ही गोष्ट अधिकाऱ्यांनी मा.मंत्रिमहोदयांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळासमक्ष सांगितली. तेव्हा मा. मंत्रिमहोदयांनी संतापून या अधिकाऱ्यांना असे विचारले की, ''थकबाकी अदा करण्यासाठी हे अनुदान केंद्राकडून आलेले आहे, तर मग ते तुम्ही दाबून कशाला ठेवले?''***

***अधिकाऱ्यांचे हे कृत्य अशोभनीय आहे, असे शिक्षकांना वाटते.***

*(पत्राचा परिच्छेद २४ (ब) (३) पहा)*

***त्या बैठकीमध्ये एकमताने ''नो वर्क नो पे हा निर्णय येथे लागू पडत नाही'' असा निर्णय करावयाचा व नेमके त्याच्या विरुद्ध ''नो वर्क नो पे या तत्वानुसारच निर्णय करावा लागेल उच्च शिक्षण विभागाचा प्रस्ताव मान्य करता येत नाही'' असे मत मांडणारी टिपणी सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करावयाची, हे वित्त सचिवांचे कृत्य अशोभनीय होय !***

*(पत्राचा परिच्छेद २४ (अ) पहा)*

१२ महिने झाले तरी त्याची अंमलबजावणी झाली नाही. पूनर्विलोकन याचिका मा.उच्च न्यायालयात फेटाळली गेली, त्याला ४ महिने झाले, तरी मूळ निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. सर्वोच्च न्यायालयात निर्णय होऊनही त्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे सभागृहात तळमळीने प्रश्न मांडणाऱ्या सदस्यांना प्रोत्साहन देण्याचे सोडून "तुम्हाला अवमान याचिका दाखल करता येते. काळजी करण्याचे कारण नाही" असा सल्ला एखाद्या ज्येष्ठ सदस्यांनी द्यावा हे भयसूचक आहे.

**२३.** "महाराष्ट्रातील विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना मानसिक यातना दिल्याबद्दल सर्व प्राध्यापकांची एका वर्षाची पगारवाढ रोखणार आहात काय?" अशी विचारणा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरराव रावते यांनी सभागृहात केली आहे. त्यांच्या या सूचनेचा सर्वांनीच अवश्य विचार केला पाहिजे. कारण तसे झाल्यास महाराष्ट्राला अनेक कटू सत्ये कळून येतील. एक वर्षाची पगारवाढ रोखायची तर चौकशी करावी लागेल, कारणे दाखवा नोटीस द्यावी लागेल, शिक्षकांचे म्हणणे ऐकून घ्यावे लागेल आणि त्यानंतर मगच पगारवाढ रोखण्याचे आदेश काढता येतील. **हजारो शिक्षकांची पगारवाढ रोखण्यासाठी चौकशी आयोगच बसवावा लागेल. त्या चौकशीतून पुढील विदारक सत्ये बाहेर येतील.**

**(अ)** "शासनाने वेळेवर निर्णय न घेतल्यामुळे या शिक्षकांना आंदोलन करावे लागले" हा मा. उच्च न्यायालयाच्या १० मे २०१३ रोजीच्या निर्णयातील निष्कर्ष त्यामुळे पुन्हा एकदा जगासमोर येईल.

**(ब)** इतर कोणत्याही कर्मचाऱ्यासाठी वेतन आयोगाच्या थकबाकी पोटी एक रुपयाची मदत केंद्र शासनाकडून मिळत नाही. या शिक्षकांच्या थकबाकी पोटी सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी १५०० ते १६०० कोटी रुपयाची मदत देण्यास केंद्र शासन तयार असतांना ती मदत नाही मिळाली तरी चालेल पण थकबाकी आम्ही केंद्राच्या आदेशाप्रमाणे देणार नाही असा निर्णय घेणाऱ्या उच्च शिक्षण विभागाला मा.उच्च न्यायालयाच्या १० मे २०१३ च्या निर्णयामुळे ती थकबाकी द्यावी लागली व त्यामुळेच महाराष्ट्राला या कामी १५०० कोटी रूपयाचे अनुदान केंद्राकडून मिळाले नसते ते सुद्धा मिळाले ही गोष्ट अशा चौकशीमुळे जगासमोर येईल.

**(क)** परीक्षा बहिष्काराचे आंदोलन चालू असतांना उच्च शिक्षण सचिवांनी सर्व विद्यापीठांना लेखी पत्र लिहून कळविले. "परीक्षा बहिष्काराबद्दल कारवाई करण्याचे अधिकार विद्यापीठाला आहेत, तेव्हा तुम्ही ताबडतोब कारवाई सुरू करा." त्याप्रमाणे काही विद्यापीठांनी कारणे दाखवा नोटीसेस काढल्या. दिनांक १० मे रोजी मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिला. वेळेवर शासनाने निर्णय न घेतल्यामुळे त्यांच्यावर आंदोलन करण्याची वेळ आली. आज त्यांनी परीक्षेच्या कामात सहकार्य करण्याचा निर्णय न्यायालयासमोर सांगितला आहे तेव्हा **"विद्यापीठांनी कारणे दाखवा नोटीसेस मागे घ्याव्यात." मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सर्व विद्यापीठांनी नोटीसेस मागे घेतल्या.** मूल्यांकनाचे काम सुरळीत सुरू झाल्यावर सचिवांनी "७१ दिवसांचे वेतन कापा" असा आदेश काढला. शो कॉज नाही, चौकशी नाही, म्हणणे ऐकून घेणे नाही, कापा म्हणजे कापा, बहिष्कारात होते त्यांचेही कापा, नव्हते त्यांचेही कापा, ज्यांना परीक्षेचे काम दिले होते त्यांचेही कापा, ज्यांना परीक्षेचे कोणतेही काम दिले नव्हते, त्यांचेही कापा. जिवंत आहे त्याचेही कापा, त्यातला एखादा जग सोडून गेला असेल तर त्याचेही कापा. असा अघोरी कापाकापीचा आदेश कोणत्या अधिकाऱ्याने काढला होता हेही या चौकशीमुळे बाहेर येईल. **अजिबात ज्यांना परीक्षेचे कामच दिले नव्हते अशा चार शिक्षकांनी याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने त्या शिक्षकांच्या बाजूने तर निर्णय दिलाच, पण या चार शिक्षकांना १८ टक्के व्याज देण्यात यावे असा निर्णय दिला.** हा काही आजचा मुख्य विषय नाही. २-३ नमूने वर दिलेले आहेत. श्री.दिवाकरराव रावते यांच्या सूचनेप्रमाणे चौकशी आयोग बसला तर असे अनेक नमूने समोर येतील. खरे म्हणजे शिक्षक या सर्व गोष्टी विसरत चालले होते, पण त्यांना उजळणी वर्गाची सवय आहे.

**२४.** श्री.दिवाकरराव रावते यांनी प्राध्यापकांची वार्षिक वेतनवाढ रोखण्यासाठी चौकशी आयोग बसविण्याचा विचार मांडला आहे, त्यामुळे आणखी काही मुद्यांची चौकशी करता येऊ शकते काय? याचाही विचार त्यांनी करावा म्हणून काही मुद्दे मी त्यांच्या विचारासाठी सुचवित आहे.

**(अ)** मा.उच्च शिक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीची बैठक दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी झाली हे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये शासनाने नमूद केलेले आहे. या समितीच्या बैठकीत "काम नाही, वेतन नाही हे तत्त्व या ठिकाणी लागू होत नाही कारण त्या शिक्षकांनी आपले काम पार पाडलेले आहे," असा एकमताने निर्णय घेण्यात आला. या समितीमध्ये वित्त विभाग (व्यय) सचिव श्री. राजीव कु. मित्तल हे एक सदस्य होते. ते समितीच्या बैठकीला उपस्थित होते. तशी समितीच्या अधिकृत कार्यवृत्तामध्ये नोंद आहे. हे कार्यवृत्त शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात सादर केले आहे. समितीचा एकमताने निर्णय झाल्यानंतर तत्कालीन उच्च शिक्षण मंत्र्यांनी याबाबतचे निदेश पारित केले. असे असतांना वित्त विभागाचे (व्यय) श्री.राजीव कु. मित्तल हेच सचिव, यांची सर्वोच्च न्यायालयामध्ये मात्र त्या निर्णयाच्या विरोधात शपथपत्रावर विरुद्ध टिपणी दाखल केली जाते. वित्त विभागाच्या सचिव पदावर काम करणाऱ्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने समितीच्या बैठकीला उपस्थित राहून मंत्रिमहोदयांच्या अध्यक्षतेखाली **त्या बैठकीमध्ये एकमताने "नो वर्क नो पे हा निर्णय येथे लागू पडत नाही" असा निर्णय करावयाचा व नेमके त्याच्या विरुद्ध "नो वर्क नो पे या तत्वानुसारच निर्णय करावा लागेल उच्च शिक्षण विभागाचा प्रस्ताव मान्य करता येत नाही" असे मत मांडणारी टिपणी सर्वोच्च न्यायलयामध्ये दाखल करावयाची, हे वित्त सचिवांचे कृत्य अशोभनीय** असल्यामुळे त्यांची एका वर्षाची वेतनवाढ रोखण्याइतकी शक्ती श्री.दिवाकरराव रावते यांच्याकडे आहे किंवा नाही? हे मला ठाऊक नाही पण निदान या प्रकरणाची चौकशी करून असे अशोभनीय वर्तन या सचिवांनी का म्हणून केले? याबाबत त्यांच्यावर कारवाई करण्याची

***उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आलेली नसेल तर त्याची अंमलबजावणी करणे भाग आहे व ही जबाबदारी कक्ष अधिकारी किंवा उच्च शिक्षण विभागातील विभागीय सहसंचालक दर्जाचे अधिकारी यांनी पार पाडावी असे स्पष्ट आदेश दिलेले असतांना मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी मंत्रिमहोदयांना वित्त विभागाचा सल्ला किंवा मान्यता घेण्याचा सल्ला देतात त्यांचे हे कृत्य अशोभनीय होय !***

*(पत्राचा परिच्छेद २४ (क) पहा)*

**वित्त मंत्रालयातील बाबूंच्या कृपेवर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी घटनाकारांनी सोडलेली नाही, यापेक्षा विपरित मांडणी घटनेच्या घोर अज्ञानाची अघोरी मांडणी आहे.**

*(पत्राचा परिच्छेद ५ पहा)*

मागणी करण्याचा अधिकार श्री.दिवाकरराव रावते यांना निश्चितच आहे.

**(ब)** (१) "सातवा वेतन आयोग लागू केल्यामुळे अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सुमारे २६ हजार ७४१ शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. वेतन आयोगातील तरतुदी १ जानेवारी २०१६ पासून लागू केल्याने ३१ मार्च २०१९ पर्यंत २५८४ कोटी ४७ लाख एवढा वाढीव खर्च येणार असून **त्यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा व केंद्र शासनाचा ५० टक्के हिस्सा आहे. या खर्चास मान्यता देण्यात आली असून** १ एप्रिल २०१९ नंतर येणाऱ्या ८०० कोटी रुपयांच्या वाढीव **खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.**"

**मंत्रिमंडळाने ५ मार्च २०१९ रोजीच्या बैठकीत घेतलेला निर्णय मी वर शब्दशः उधृत केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरराव रावते या मंत्रिमंडळाचे सदस्य होते. थकबाकीबाबत मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर नेमका तेवढा भाग शासननिर्णय काढतांना वगळून टाकण्याचा अधिकार मंत्रालयातील अधिकाऱ्यांना कोणी दिला?** याचा परिणाम असा की, सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना थकबाकी कशी अदा केली जाईल? याची तरतूद त्यांच्या शासननिर्णयात आहे व त्यातील काही थकबाकी त्यांना मिळालेली आहे. उर्वरित मिळणार आहे. सेवानिवृत्त कर्मचारी, सेवानिवृत्त विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापक या सर्वांना थकबाकी कशी दिली जाईल? याची तरतूद त्यांच्या शासननिर्णयामध्ये आहे आणि त्याप्रमाणे त्यांना थकबाकीचा काही भाग मिळालेला आहे व उरलेला भाग शासननिर्णयातील तरतुदीप्रमाणे मिळणार आहे.

(२) **सेवानिवृत्त प्राध्यापकांना थकबाकी मिळते, परंतु कार्यरत असलेल्या प्राध्यापकांची थकबाकी कधी मिळेल? कशी मिळेल? याबाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेऊनसुद्धा तेवढा भाग शासननिर्णयातून वगळण्याचे शौर्य ज्या अधिकाऱ्याने दाखविले त्याचे हे कृत्य अशोभनीय** असल्यामुळे त्याची एका वर्षाची वेतनवाढ रोखण्याइतकी शक्ती श्री.दिवाकरराव रावते यांच्याकडे आहे किंवा नाही? हे मला ठाऊक नाही पण निदान या प्रकरणाची चौकशी करून असे अशोभनीय वर्तन या सचिवांनी का म्हणून केले? याबाबत त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्याचा अधिकार श्री.दिवाकरराव रावते यांना निश्चितच आहे.

**(३) या शिक्षकांची थकबाकी अदा करण्यासाठी जवळ जवळ १३०० कोटी रुपयाचे अनुदान केंद्र शासनाकडून उच्च शिक्षण विभागाला प्राप्त झालेले आहे, ही गोष्ट अधिकाऱ्यांनी मा.मंत्रिमहोदयांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळासमक्ष सांगितली. तेव्हा मा. मंत्रिमहोदयांनी संतापून या अधिकाऱ्यांना असे विचारले की, "थकबाकी अदा करण्यासाठी हे अनुदान केंद्राकडून आलेले आहे, तर मग ते तुम्ही दाबून कशाला ठेवले?" अधिकाऱ्यांचे हे कृत्य अशोभनीय आहे, असे शिक्षकांना वाटते.** श्री.दिवाकरराव रावते यांना यापेक्षा काही वेगळे वाटत असेल असे आम्हा कोणालाही वाटत नाही.

**(क)** मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर त्या निर्णयातून उद्भवणारा खर्च हा राज्याच्या संचित निधीवरील भारित खर्च (charged expenditure) असतो. ही भारतीय संविधानातील तरतूद श्री.दिवाकरराव रावते यांना निश्चितच माहित आहे. असा भारित खर्च विधानमंडळाला सादर करावयाच्या वित्तीय विवरण पत्रामध्ये वेगळा दाखवावा लागतो व तो त्या वित्तीय विवरण पत्राचा अमतदेय भाग (non-votable part) असतो. त्यावर चर्चा करता येते, मात्र मतदान करता येत नाही. याचीही माहिती श्री.दिवाकरराव रावते यांना आहे. ती माहिती सर्व अधिकाऱ्यांना सुद्धा आहे. मुख्य सचिव, वित्त सचिव, विधी व न्याय सचिव व उच्च व तंत्र शिक्षण सचिव यांनी पत्रके काढून यासाठी कोणाचाही सल्ला किंवा संमती घेण्याची गरज नाही. **उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आलेली नसेल तर त्याची अंमलबजावणी करणे भाग आहे व ही जबाबदारी कक्ष अधिकारी किंवा उच्च शिक्षण विभागातील विभागीय सहसंचालक दर्जाचे अधिकारी यांनी पार पाडावी असे स्पष्ट आदेश दिलेले असतांना मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी मंत्रिमहोदयांना वित्त विभागाचा सल्ला किंवा मान्यता घेण्याचा सल्ला देतात त्यांचे हे कृत्य अशोभनीय** असल्यामुळे त्यांची एका वर्षाची वेतनवाढ रोखण्याइतकी शक्ती श्री.दिवाकरराव रावते यांच्याकडे आहे किंवा नाही? हे मला ठाऊक नाही पण निदान या प्रकरणाची चौकशी करून असे अशोभनीय वर्तन या सचिवांनी का म्हणून केले? याबाबत त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्याचा अधिकार श्री.दिवाकरराव रावते यांना निश्चितच आहे.

**२५.** वर फक्त तीन प्रकार नमूद केलेले आहेत. असे अर्धा डझन प्रकार नमूद करता येतील. वर नमूद केलेल्या तीन प्रकरणाच्या बाबतीत श्री.दिवाकरराव रावते यांनी कारवाई मागण्याचे ठरविले तर चौकशी करून कोणी चूक केलेली आहे हे समजल्यावर ज्याने चूक केलेली आहे त्याच्यावरच कारवाई केली जावी असे मला अपेक्षित आहे. चौकशी न करता, त्या अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून न घेता त्यांच्यावर कारवाई करावी असे मला दुरान्वये सुद्धा सुचवावयाचे नाही. कारण असे करणे म्हणजे कोणतीही चौकशी न करता कोणाचेही म्हणणे ऐकून न घेता लेखणीच्या एका फटकाऱ्या सरशी शेकडो शिक्षकांचे वेतन कापणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पंगतीला आपण जाऊन बसणे होय, हे सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे.

*****

**न्यायालयीन प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. एखादे न्यायालयीन प्रकरण कार्यवाहीविना प्रलंबित राहिल्यास संबंधित कार्यासनाच्या कक्ष अधिकारी यांना त्याबाबत व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.**

*(पत्राचा परिच्छेद १० पहा)*

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 20.03.2020) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.04.2020**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------

To,.......................................................

...........................................................

...........................................................

...........................................................